MHKO030095062024

दाखल दिनांक - २१/०६/२०२४

नोंदणी दिनांक - २४/०६/२०२४.

निकाल दिनांक - १०/०३/२०२६.

कालावधी - वर्षे महिना दिवस.

०१ ०८ १७.

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१४, कोल्हापूर यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी: शिल्पा वि. कुलकर्णी),**

**नि.फौ.ख.क्र.९१४/२०२४.** **निशाणी क्रमांक २४/ब.**

**गु.र.क्र.५०२/२०२३.**

**दोषारोप –** भा.दं.वि.सं.कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>**गांधीनगर पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर.** |
| अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता | | श्रीमती आर.आर.देशपांडे. |
| **आरोपी क्र.** | | **०१. उमेश बापुसो मगदुम,**<br>व.व.६४, धंदा - सुखवस्तु,<br>**०२. मंदार उमेश मगदुम,**<br>व.व.३१, धंदा - खाजगी नोकरी,<br>**०३. सौ.पद्मा उमेश मगदुम,**<br>व.व.५५, धंदा - घरकाम,<br>**०४. सौ.मेघा मंदार मगदुम,**<br>व.व.२७, धंदा - खाजगी नोकरी, |

| | | |
|---|---|---|
| | | सर्व रा.गडमुडशिंगी, ता.करवीर,<br>जि.कोल्हापूर. |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | | श्री.जे.जी.शेख. |

<u>**भाग-ब**</u>

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | :- | २९/१२/२०२३. |
| गुन्हा नोंद झाल्याचा दिनांक | :- | २९/१२/२०२३. |
| दोषारोप पत्र दाखल केल्याचा दिनांक | :- | २१/०६/२०२४. |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | १७/१०/२०२४. |
| साक्षी पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | २३/०२/२०२६. |
| साक्षी पुरावा बंद केल्याचा दिनांक | :- | २७/०२/२०२६. |
| निकाल देण्यासाठीचा दिनांक | :- | १०/०३/२०२६. |
| निकाल दिनांक | :- | १०/०३/२०२६. |
| शिक्षा दिल्याचा आदेश दिनांक (असेल तर) | :- | निरंक. |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक. |

<u>**आरोपींची माहिती**</u>

| अ. क्र. | आरोपींची नावे | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | भा.ना.सु.सं.कलम ४६८ अन्वये समायोजित (Set Off) करण्या बाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१.<br>०२.<br>०३.<br>०४. | उमेश मगदुम,<br>मंदार मगदुम,<br>पद्मा मगदुम,<br>मेघा मगदुम, | ४१-अ प्रमाणे नोटीस दिली. | -- | भा.दं.वि.सं.क. ३२४, ३२३, ५०४, ५०६ कलम ३४ प्रमाणे. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग-क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| **०१.** | सुनिल शामराव ढेरे | फिर्यादी | २० |

**ब. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| **०१.** | २४ | फिर्यादवरील सहीस. |

# न्या य नि र्ण य

**( पारित दि.१० मार्च, २०२६ रोजी.)**

आरोपी क्र.०१ ते ०४ यांच्याविरुध्द भा.दं.वि.सं.कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये आरोप ठेवून सदरचा खटला चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाचे कथन खालीलप्रमाणे -**

**०२.** फिर्यादी यांच्या आईची गडमुडशिंगी, ता.करवीर, जि.कोल्हापूर येथे वडीलो - पार्जित १२ एकर शेती आहे. त्या जमिनीच्या वाटणीवरुन फिर्यादी व त्यांचा चुलत मामा यांच्यामध्ये गेली १० वर्षांपासुन वाद सुरु आहे. त्याबाबत फिर्यादी यांनी दावा दाखल केला होता. त्यामध्ये दोन एकर शेती फिर्यादी यांच्या आईला मिळण्याबाबत निकाल दिला होता. त्यावेळी आरोपी क्र.०१ यांनी फिर्यादीविरुध्द अपिल दाखल केले. त्याची नोटीस फिर्यादी यांना मिळाली. दि.२९/१२/२०२३ रोजी दु.१५.०० वा.चे सुमारास आरोपीच्या घरासमोर रस्त्याजवळ गडमुडशिंगी ता.करवीर, जि.कोल्हापूर येथे फिर्यादी यांनी आरोपींना सदर नोटीसीबाबत विचारणा केली असता आरोपी क्र.०१ ते ०४ यांनी

त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्न:सारणार्थ शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली तसेच आरोपी क्र.०४ याने त्यांच्या जवळील कटरने फिर्यादीच्या डाव्या हातावर मारुन जखमी करुन धमकी दिली. म्हणुन गांधीनगर पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली. त्यानंतर प्रथम खबर अहवाल दाखल करण्यात आला. प्रथम खबर अहवाल दाखल झाल्यानंतर गु. र.क्र.५०२/२०२३ नोंदविला व तपास तपासणी अधिकारी पो.हे.कॉ.श्री.एस.एस.सावंत यांच्याकडे सुपुर्त करण्यात आला. त्यांनी घटनास्थळी जाऊन पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला, साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले व तपास पूर्ण केल्यानंतर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०३.** माझ्या पुर्वाधिकारी यांनी आरोपी क्र.०१ ते ०४ हे न्यायालयात हजर झाल्यानंतर त्यांच्यावर भा.दं.वि.सं.कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप नि.क्र.१३ लगत नोंदविले. सदरचा दोषारोप नाकारुन आरोपींनी संपरिक्षेची मागणी केली. त्यानंतर साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. आरोपींविरुध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर न आल्याने आरोपींचे भा.ना.सु.सं.कलम ३५१ अन्वये निवेदन निरस्त करण्यात आले. तसा आदेश नि.क्र.०१ लगत पारीत करण्यात आला आहे.

**०४.** अभिलेखावर आलेला पुरावा, कायद्याच्या तरतुदी लक्षात घेतल्यावर तसेच अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील व आरोपींचे वकील यांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे विचारार्थ उद्भवतात. त्या मुद्दयांवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

| <u>अ.क्र</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| **०१.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, दि.२९/१२/२०२३ रोजी १५.०० वा.सुमारास आरोपीच्या घरासमोर रस्त्याजवळ गडमुडशिंगी ता.करवीर, जि.कोल्हापूर आरोपी क्र.०४ याने आरोपी क्र.०१ ते | **<u>नकारार्थी.</u>** |

| | | |
|---|---|---|
| | ०३ यांच्या सोबतच्या समान उद्देशाच्या पुर्नःसारणार्थ फिर्यादीस कटरसारख्या घातक हत्याराने गंभीर दुखापत पोहोचविली ? | |
| **०२.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपी क्र.०१ ते ०४ यांनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्नःसारणार्थ फिर्यादीस इच्छापुर्वक मारहाण करत दुखापत केली ? | **नकारार्थी.** |
| **०३.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपी क्र.०१ ते ०४ यांनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्नःसारणार्थ फिर्यादी यांना जाणिवपूर्वक शिवीगाळ करुन त्यांचा अपमान केला व सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास प्रवृत्त केले ? | **नकारार्थी.** |
| **०४.** | अभियोगपक्ष हे सिध्द करतो का की, वर नमुद दिवशी, ठिकाणी व वेळी आरोपी क्र.०१ ते ०४ यांनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्नःसारणार्थ फिर्यादी यांना फौजदारीपात्र धाकदपटशा दाखविला? | **नकारार्थी.** |
| **०५.** | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र.०१ ते ०५ करिता -**

**०५.** वरिल चारही मुद्दे एकत्र गुंतले असल्यामुळे पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रीत चालविणेसाठी घेतले आहेत. अभियोगपक्षाने खटला शाबीत करण्यासाठी केवळ एका साक्षीदाराची साक्ष नोंदवली. साक्षीदार क्र.०१ सुनिल शामराव ढेरे (फिर्यादी) यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, आरोपी क्र.०१ हे त्यांचे चुलत मामा, आरोपी क्र.०२ हा चुलत मामेभाऊ, आरोपी क्र.०३ ही चुलत मामी व आरोपी क्र.०४ ही आरोपी क्र.०२ ची बायको आहे. सर्व आरोपी राहण्यास मुडशिंगी येथे आहेत. त्यांच्या आईचे नाव सुमन शामराव ढेरे आहे. त्यांच्या आईला भाऊ-बहिण नसल्याने त्यांच्या आईला तिच्या

माहेरची म्हणजेच मुडशिंगी येथील शेती मिळाली आहे. सदरची शेती मोजणीनंतर मंडल अधिका-यांनी आईच्या ताब्यात दिली. निकालाच्या आधारवर त्यांच्या आईचे नाव सातबा-याला मालकी सदरी नोंद झाली. साक्षीदाराचे पुढे असे कथन आहे की, दि.२९/१२/२०२३ रोजी दु.०३.०० वाजता काहीही प्रकार घडलेला नाही. सदर दिवशी गांधीनगर पोलीस ठाण्यात त्यांनी फिर्याद दिली होती. फिर्यादवर त्यांची सही (नि. क्र.२४) असुन त्यातील मजकुराबाबत त्यांना काही माहिती नाही. त्या दिवशी आरोपीने त्यांना शिवीगाळ करत चाकुने मारहाण केली असा कोणताही प्रकार घडला न्हवता.

**०६.** सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्याने त्याचा उलट तपास घेतला असता त्याने मान्य केले आहे की, आरोपी व त्यांच्या आईमध्ये आईला मिळालेल्या शेतीवरुन वाद होते. आरोपीने केलेल्या अपीलाची नोटीस त्यांना मिळाली. त्यांचा व आरोपीमधील वाद न्यायालयाबाहेर मिटलेला आहे. त्यामुळे त्यांची आरोपी विरुध्द कोणतीही तक्रार नाही. त्यांची न्यायालयाबाहेर तडजोड झाली असल्यामुळे सदरचे काम निकाली करण्यास त्यांची काही हरकत नाही. सदर कामी त्यांना आणखी साक्षीदार तपासायचे नाहीत.

**०७.** नि.क्र.२२ लगत दाखल केलेली पुरसिस व न्यायालयीन पटलावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपींविरुध्द कोणताही गुन्हा सिध्द होत नाही. फिर्यादी व आरोपींचे आपसात तडजोड झाल्याने साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नाहीत. परिणामी, आरोपी क्र.०१ ते ०४ यांनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्न:सारणार्थ शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली तसेच आरोपी क्र.०४ याने त्यांच्या जवळील कटरने फिर्यादीच्या डाव्या हातावर मारुन जखमी करुन धमकी दिली ही बाब सिध्द झालेले नाही. फौजदारी प्रक्रिया संहिता, सदर कलमाचे मुलभुत घटक आपसात तडजोड झाल्यामुळे सिध्द होत नाही. न्यायतर्क शास्त्रानुसार फौजदारी प्रकरणात संशयाच्या फायदा हा आरोपी पक्षास जातो. सदर कामी आलेला पुरावा हा संशयी

स्वरुपाचा वाटतो. त्यामुळे त्याचा फायदा आरोपी पक्षास देणे न्यायोचित वाटत आहे. तपासी अंमलदार यांनी तपासादरम्यान एक कटर जप्त केले आहे. सदरचा मुद्देमाल हा मौल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नियमानुसार नष्ट करावा असे आदेशित करणे न्यायोचित वाटत आहे. सबब, मुद्दा क्र.०१ ते ०४ करिताचे निष्कर्ष नकारार्थी देत असून मुद्दा क्र.०५ चे निष्कर्षाप्रत पुढील आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

**०१.** आरोपी क्र.०१ ते ०४ यांची भा.ना.सु.सं.कलम २७१(१) अन्वये भा.दं.वि.सं.कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**०२.** आरोपींचे जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

**०३.** गुन्हयामधील जप्त मुद्येमाल – एक कटर हे मौल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नियमानुसार नष्ट करण्यात यावे.

**०४.** आरोपींनी भा.ना.सु.सं.कलम ४८१ प्रमाणे पुर्ततेसाठी प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/- प्रमाणे वैयक्तीक जातमुचलका देण्यात यावा.

*(सदरचा न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित.)*

Digitally signed by SHILPA VISHVESH KULKARNI
Date: 2026.03.11 11:49:05 +0530

( शिल्पा वि. कुलकर्णी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१४, कोल्हापूर.

दि.१०/०३/२०२६.